# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नागपूर

दुरध्वनी क्रं.-२५६५१४३ E-mail: ronagpur@dtemaharashtra.gov.in
फॅक्स क्रं.- ०७१२-२५६१६६३ Web Site :- www.rdtenagpur.org.in

**महत्वाचे**

क्रमांक:- तंशिस/विकाना/शैवि-२/पदविका/प्रवेश/२०१९/ 1588
दिनांक:- 17 MAY 2019

प्रति,

प्राचार्य,
शासकीय, अशासकीय अनुदानित व
खाजगी पदविका तंत्रनिकेतन संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

विषय:- शै.वर्ष २०१९-२० पासून तंत्रनिकेतन प्रवेशासाठी माध्यमिक शाळांद्वारे प्रवेशासाठी विद्यार्थ्यांची ऑनलाईन फार्म भरुन घेणे व त्यासंबंधी शाळांमध्ये कार्यशाळा आयोजित करणेबाबत...

संदर्भ:- १. मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,मुबंई यांचे पत्र क्रं. १०एडीएम/पदविका/कार्यशाळा/२०१९/५१९ , दिनांक- १६/०५/२०१९

२. सहसचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचे पत्र क्रं.संकीर्ण -२०१९/प्र.क्र.१०४/एसडी-२ दि.१५/०५/२०१९

उपरोक्त विषयांच्या अनुषंगाने शै.वर्ष २०१९-२० पासून तंत्रनिकेतनातील पदविका प्रवेशासाठी राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये जागृती घडविण्यासाठी नागपूर विभागातंर्गत असलेल्या पदविका अभ्यासक्रमाच्या तंत्रनिकेतन संस्थातील प्राचार्य / विभागप्रमुख यांनी विभागातील शासकीय व खाजगी अनुदानित माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षण पदविका अभ्यासक्रमाची प्रवेश नियमावली व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेची संपूर्ण माहिती होण्याकरीता कार्यशाळेचे आयोजन करण्यात यावे. (संदर्भीय पत्राची प्रत संलग्न).

तसेच आपणास कळविण्यांत येते की, याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा

**(डॉ.चंद्रशेखर थोरात)**
**प्र.सहसंचालक**
**तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,**
**नागपूर**

**प्रत:- मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुबंई ०१ यांना माहितीकरीता मानार्थ सादर. (कार्यासन क्रं.१०)**

तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दुरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९०००७.
E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in

तात्काळ/ईमेलव्दारे

क्रमांक : १०/एडीएम/पदविका/कार्यशाळा /२०१९/ ५१९
दिनांक : 16 MAY 2019

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपुर/नाशिक/पुणे.

**विषय:- शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून तंत्रनिकेतन प्रवेशासाठी माध्यमिक शाळांव्दारे प्रवेशासाठी विदयार्थ्यांची ऑनलाईन फॉर्म भरुन घेणे व त्यासंबंधी शाळांमध्ये कार्यशाळा आयोजित करणेबाबत...**

संदर्भ:- सहसचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचे पत्र क्रमांक संकीर्ण-२०१९/ प्र.क्र.१०४/एसडी-२ दि. १५.०५.२०१९

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासुन तंत्रनिकेतनातील पदविका प्रवेशासाठी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विदयार्थ्यांमध्ये जागृती घडविण्यासाठी कार्यशाळा आयोजनासंदर्भात आवश्यक ते निर्देश शालेय शिक्षण व क्रिडा विभागाने संदर्भाधिन पत्रान्वये संबंधितांना दिले आहेत. त्वरीत संदर्भासाठी पत्राची प्रत सोबत जोडत आहे.

त्याअनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, सदर बाब आपल्या अधिपत्याखालील सर्व तंत्रनिकेतनाच्या प्राचार्य/संचालक यांना संदर्भिय पत्रात नमुद केल्यानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्याकरिता लेखी निदर्शनास आणुन देण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आपल्यामार्फत या संचालनालयास सादर करण्यात यावा.

(डॉ अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई

प्रत:- माहिती व उचित कार्यवाहीसाठी रवाना.

१. कार्यासन क्रमांक ३, मुख्य कार्यालय, मुबई यांना कळविण्यात येते की, सदर पत्र या संचालनालयाच्या संकतस्थळावर प्रसिध्द करावे. तसेच पुढील उचित कार्यवाहीसाठी.
२. प्राचार्य/संचालक, शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित पदविका अभ्यासक्रमाच्या तांत्रिक संस्था.
३. निवड नस्ती

**महाराष्ट्र शासन**

| तात्काळ<br>mail - govind.kamble@nic.in | क्रमांक:- संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१०४/एसडी-२<br>शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,<br>मादाम कामा मार्ग, हुतात्मा<br>राजगुरु चौक,मंत्रालय, मुंबई-३२<br>दिनांक :- १५ मे,२०१९ |
|---|---|

प्रति,

१) शिक्षण संचालक (माध्यमिक),
महाराष्ट्र राज्य,पुणे.

२) संचालक (तंत्रशिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे.

३) सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद

**विषय** :- शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून तंत्रनिकेतन प्रवेशासाठी माध्यमिक शाळांद्वारे प्रवेशासाठी विद्यार्थ्यांची ऑनलाईन फॉर्म भरून घेणे व त्यासंबंधी शाळांमध्ये कार्यशाळा आयोजित करणेबाबत.

**संदर्भ** :- उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे पत्र क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.६१/ तां.शि-५, दि.२५ मार्च,२०१९

शैक्षणिक वर्ष सन २०१९-२० पासून तंत्रनिकेतन प्रवेशासाठी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये जागृती घडविण्यासाठी कार्यशाळा आयोजनासंदर्भात आवश्यक निर्देश राज्यातील शिक्षणाधिकाऱ्यांना देण्याची विनंती संदर्भाधीन पत्रान्वये केली आहे.

२. यानुषंगाने याव्दारे आदेशित करण्यात येते की, पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे निर्देश आपले स्तरावरून शिक्षणाधिकाऱ्यांना देण्यात यावेत.

(१) तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अंतर्गत असलेल्या पदविका अभ्यासक्रमाच्या प्राचार्य / विभाग प्रमुख यांचेकडून राज्यातील शासकीय व खाजगी अनुदानित माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षण पदविका अभ्यासक्रमाची प्रवेश नियमावली व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेची संपूर्ण माहिती होण्याकरिता कार्यशाळेचे आयोजन करण्यात यावे. सदर कार्यशाळा आयोजनाकरिता तंत्रनिकेतनांच्या संबधित क्षेत्रिय अधिकारी यांनी शिक्षणाधिकारी/ गटशिक्षणाधिकारी याच्यांशी समन्वय साधून माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापक / शिक्षक यांच्या सहकार्याने कार्यशाळेचे आयोजन करावे.

(२) सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी तसेच तंत्र शिक्षण विभागातील क्षेत्रीय अधिकारी यांनी यानुषंगाने आवश्यक पुढील कार्यवाही करावी.

(डॉ.सुवर्णा खरात)
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत- माहितीस्तव तथा आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित

१.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४००००१

२. सर्व गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती.